बीड । शनिवार
१४.०६.२०२५
वर्षे : ५ अंक : ७४
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com
# मराठवाडा पत्र
■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 

# आ. सुरेश धस यांच्या लाडक्या कार्यकारी अभियंता कृष्णा पानसंबळच्या कार्यक्षेत्रातील बोगस पुलाचे बिल उचलले !

## तवलवाडी ते देवीगव्हाण कागदी पुलाचे प्रकरण चर्चेत

## कृष्णा पानसंवळ यांच्या कार्यकाळातील सर्व कामांची चौकशी करा

**बीड । प्रतिनिधी**

बीडच्या आष्टी मतदार संघाचे आमदार सुरेश धस यांच्या मतदारसंघात केवळ कागदोपत्री पूल दाखवून दहा लाखांचा निधी लाटण्याचा प्रकार समोर आला होता.. दरम्यान ही बातमी होताच प्रसारित होताच याची दखल घेत प्रशासनाने पुलाच्या बांधकामाला प्रत्यक्षात सुरुवात केली. विशेष म्हणजे आष्टी पाटोदा शिरूर या तालुक्याचे शाखा अभियंता म्हणून सध्याचे प्रभारी कार्यकारी अभियंता कृष्णा पानसंबळ यांच्याकडे कारभार होता. हा पुल वर्षापूर्वीच झाला पाहिजे होता. मात्र आमदार सुरेश धस यांचे लाडके असलेले प्रभारी कार्यकारी अभियंता कृष्णा पानसंबळ यांच्या काळात तो फक्त कागदावरच झाला असल्याची गावकऱ्यांची तक्रार होती.

आष्टी तालुक्यातील तवलवाडी ते देवीगव्हाण या गावांना जोडणाऱ्या नदीवर दहा लाखांचा पूल मंजूर करण्यात आला. परंतु वर्षभरापूर्वीच या पुलाचे काम पूर्ण झाल्याचे दाखवून बिल देखील उचलण्यात आले.या पुलाची निर्मिती व्हावी अशी मागणी ग्रामस्थांकडून केली जात होती.तसेच राहुल जगताप या तरुणांने देखील बेमुदत उपोषण सुरू केले..दरम्यान या सर्वाची दखल घेत प्रशासन कामाला लागले आहे. केवळ कागदोपत्री पूल दाखवून निधी लाटल्याचा धक्कादायक प्रकार बीड जिल्ह्यात समोर आला होता. आमदार सुरेश धस यांच्या आष्टी मतदारसंघातील ही गंभीर प्रकाशझोतात आली आणि अखेर प्रशासनाला जाग आली. ग्रामस्थांच्या संघर्षानंतर आणि माध्यमांच्या पाठपुराव्यामुळे अखेर या पुलाच्या प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली आहे. आष्टी तालुक्यातील तवलवाडी ते देवीगव्हाण या दोन गावांना जोडणाऱ्या नदीची. या ठिकाणी सुमारे दहा लाखांचा पूल मंजूर झाला होता. मात्र वर्षभरापूर्वीच या पुलाचे काम पूर्ण झाल्याचे दाखवत अधिकाऱ्यांनी बिल उचलले होते. प्रत्यक्षात त्या ठिकाणी कुठलाही पूल नव्हता, त्यामुळे गावकऱ्यांना पावसाळ्यात नदी पार करणे अवघड व्हायचे. यामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी होती.

ही बाब समोर आल्यानंतर तवलवाडीतील युवक राहुल जगताप याने थेट बेमुदत उपोषण सुरू केले होते. ▶▶ उर्वरित पान २ वर

# धनंजय मुंडेंच्या राष्ट्रवादी भवन भेटीस तुफान गर्दी

## पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिकांची कामे मार्गी लावण्यात धनंजय मुंडे ४ तास रमले

**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा माजी मंत्री आ धनंजय मुंडे आता पुन्हा एकदा कामकाजात कम ालीचे सक्रिय झाले असून आज त्यांनी बीड येथील राष्ट्रवादी काँग्रेस भवन येथे जनता संवाद उपक्रमास उपस्थित राहून पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते तसेच नागरिकांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी व कामे समजून ▶▶ उर्वरित पान २ वर



# अर्थमंत्री अजित दादा पवार यांच्याशी चर्चा करुन विनाअनुदानित शाळेतील शिक्षकांचा प्रश्न मार्गी लावणार: धनंजय मुंडे

## माजी मंत्री धनंजय मुंडे यांचे बीड जिल्हा विनाअनुदानित शाळा कृती समितीला आश्वासन!

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य विनाअनुदानित शाळा कृती समितीची रास्त मागणी सभागृहात मांडून येत्या पावसाळी अधिवेशनात टप्पा वाढीसाठी आवश्यक निधीची तरतूद करण्यासाठी उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित दादा पवार यांच्याशी चर्चा करून निधीची तरतूद होई पर्यंत पाठपुरावा करून आपला प्रश्न मार्गी लावतो असे आश्वासन माजी कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी विना अनुदानित शाळा कृती समितीचे जिल्हाध्यक्ष आत्माराम वाव्हळ आणि जेष्ठ समाजसेवक डॉ. संजय तांदळे यांना दिले.

माजीमंत्री धनंजय मुंडे हे काल दि. १३ जून रोजी बीड शहरात आले असता बीड जिल्हा विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या वतीने जिल्हाध्यक्ष आत्माराम वाव्हळ आणि सामाजिक कार्यकर्ते डॉ. संजय



तांदळे यांनी त्यांची भेट घेऊन विना अनुदानित शाळेतील शिक्षकांच्या विविध मागण्यांचे निवेदन दिले. या मध्ये प्रामुख्याने राज्यातील अंशतः अनुदानित शाळांना १४ ऑक्टोबर २०२४ च्या शासन आदेध्याशानुसार वाढीव टप्प्यासाठी लागणाऱ्या आवश्यक निधीची तरतूद करावी अशी मागणी करण्यात आली. यावेळी विनाअनुदानित शाळा कृती ▶▶ उर्वरित पान २ वर

# घरकुल धारकांनी कुणालाही रूपया देऊ नये, घराचे लवकर काम करून दिवाळी नव्या घरात साजरी करावी: गटविकास अधिकारी बागलाने

**आष्टी । प्रतिनिधी**

तालुक्यात जवळपास नवीन घरांसाठी वीस हजार पेक्षा अधिक मागणी अर्ज बेघर धारकांनी केले आहेत.आता नविन मंजूर झालेल्या घरकुल धारकांनी कुणालाही एक रूपाया देऊ नये,जर कुणी मागणी केली तर त्याची तक्रार आमच्याकडे रितसर करावी आणि यंदाची दिवाळी नव्या घरात साजरी करावी असे आवाहन आष्टी पंचायत समिती चे गटविकास अधिकारी जी.व्ही.बागलाने यांनी केले आहे.

आष्टी पंचायत समिती कार्यालयातील गटविकास अधिकारी यांच्या कक्षेत शुक्रवार (दि.१३)रोजी दुपारी ४.३० वा.पत्रकारांशी संवाद साधताना ते बोलत होते.पुढे बोलतांना ते म्हणाले,पक्के आणि प्रशस्त घर असावे हे प्रत्येकाचं स्वप्न असत.केंद्र व राज्य सरकारच्या संकल्पनेतून व आमदार सुरेश धस यांच्या प्रयत्नाने आष्टी तालुक्यात जवळपास २० हजारांपेक्षा जास्त गरजूंनी अर्ज दाखल केले आहेत. आता ह्या घरांची स्वप्न येत्या दिवाळीत पुर्ण होऊन यंदाची दिवाळीच नव्या घरात घरकुल धारकांनी साजरी करावी.परंतु ही ▶▶ उर्वरित पान २ वर

# शासकीय अभिलेखात खाडाखोड; दिली बनावट पिटीआर ! ग्रामसेवका विरोधात गुन्हा दाखल

**माजलगाव । प्रतिनिधी**

शहरा पासुन १कि.मी.अंतरावर असलेल्या चिंचगव्हाण येथील ग्रामसेवकाने गावाच्या हद्दीत असलेल्या ३३बाय ३३भुखंडा वरील शासकीय अभिलेखात खाडाखोड करून त्या भुखंडावर अगोदरच एकाची मालकी हक्कात अधिकृतपणे नोंद होती पण यात आणखी एकाची अनाधिकृत रित्या नोंद करून त्यांना बनावट पिटीआर दिली होती. या भुखंड घोटाळ्या प्रकरणी फसवणुक झालेल्या व्यक्तीच्या तक्रार चौकशी अंती जिप बीड चे उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या आदेशानुसार चौकशी करणारे माजलगाव पंचायत समिती मधील ग्रामविस्तार अधिकारी महेंद्र भानुदास गायकवाड यांनी माजलगाव शहर पोलीस ठाण्यात ११जून रोजी दिलेल्या फिर्यादीवरून प्रकरणातील आरोपी तथा तत्कालीन सेवानिवृत्त ग्रामसेवक डी.एस.चव्हाण रा.चिंचगव्हाण,ता.म ाजलगाव याच्या विरोधात भान्यसं कलम ४६८,४६५,४७१,४२०नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढिल तपास पोउपनि केरबा माकणे करीत आहेत. प्रकरणात मिळालेली माहिती अशी की, माजलगाव तालुक्यातील चिंचगव्हाण येथील तक्रारदार नामे बाबासाहेब ज्योतीराम शिंदे यांनी सादर केलेला नमुना नंबर ८च्या झेकॉर्स प्रती नुसार पुर्वीच्या नंबर ८वर मालमत्ता क्रमांक १२२ज्याची साईज ३३बाय ३३फुट नामे सागर दामोदर बजाज नंतर मालमत्ता क्रमांक १२३वर विक्रम गिरजाप्पा कांबळे अशी नोंद असल्याचे दिसून येते आहे. तसेच ग्रा.पं.च्या नमुना नंबर ८च्या नोंद वहिची पाहणी केली असता १२२/१असा नवीन ▶▶ उर्वरित पान २ वर

# महाडीबीटी पोर्टलवर अ.जा. अ.ज. प्रवर्गातील शेतक-यांनी ठिबक तुषार घटकासाठी अर्ज करावेत

**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रीय कृषी विकास योजना – प्रति थेंब अधिक पिक योजना अंतर्गत महाडीबीटी पोर्टलवर अनु. जाती व अनु.जमाती प्रवर्गातील शेतकरी बांधवांनी ठिबक, तुषार घटकासाठी अर्ज करावेत. असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, बीड एस.एम.साळवे यांनी केले आहे.

राष्ट्रीय कृषी विकास योजना – प्रति थेंब अधिक पिक योजनेतर्गत ठिबक/ तुषार घटकासाठी महाडीबीटी पोर्टलवर अनु. जाती व अनु.जमाती प्रवर्गातील शेतकऱ्याकरिता ९० टक्के पर्यंत अनुदान उपलब्ध आहे. या संधीचा मोठ्या प्रमाणात लाभ घ्यावा. अनुदानाची मर्यादा खालील प्रमाणे आहे.शेतकरी वर्गवारी, राष्ट्रीय कृषि विकास योजना – प्रति थेंब, अधिक पिक योजना, मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजना,बिरसा मुंडा कृषि क्रांती योजना, डॉ.बाबासाहेब कृषि स्वावलंबन योजना.

अनुदान– अल्प व अत्यल्प भूधारक (२ हे.पर्यंत क्षेत्र ) ५५ टक्के, ▶▶ उर्वरित पान २ वर

# जिल्हा प्रशासन व आरोग्य विभाग च्या वतीने मेट्रन सौ. रमा गिरी सन्मानित

## एक रमाई देशाची आई तर ही रमाई महाराष्ट्रची ताई झाली. ज्येष्ठ समाजसेवक- दीपक नागरगोजे, दत्ता बारगजे. चाळीस वर्षानंतर वर्ग मैत्रिणीची भेट पण माझ्यापेक्षाही ती ग्रेट -उपजिल्हाधिकारी

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हा रुग्णालयाच्या मुख्यआधिसेविका- मेट्रन रमा गिरी यांना नुकताच महाराष्ट्र राज्याकडून दिला जाणारा मानाचा ✻राज्यस्तरीय फ्लॉरेंस नाईटिंगेल पुरस्कार✻ महाराष्ट्र राज्याचे आरोग्य मंत्री आंबेटकर व आरोग्य विभागातील वरिष्ठ अधिकारी यांच्या हस्ते कोल्हापूर येथे देण्यात आला. हा पुरस्कार आरोग्य विभागातील सर्वोत्कृष्ट मानला जात आहे. गेल्या ३० वर्षापासून रुग्णसेवेत काम करणाऱ्या अनेक रुग्णांच्या कर्मचाऱ्यांच्या मदतीला धावून जाणाऱ्या आणि आरोग्य



सेवेचा वसा आणि वारसा समर्थपणे सेवा देणाऱ्या जिल्हा रुग्णालयाच्या मेट्रन सौ. रमा गिरी यांचा जिल्हा प्रशासनाच्या वतीने व जिल्हा आरोग्य विभागाच्या वतीने भव्य दिव्य सत्कार सोहळा जिल्हा रुग्णालय परिसरात पार पडला. यावेळी ✻जिल्हा प्रशासनातील उपजिल्हाधिकारी स्वामी साहेब, सी एस डॉक्टर संजय राऊत, जिल्हा आरोग्य अधिकारी उल्हास गंडाळ, आर एम ओ डॉ. संतोष शहाणे, डॉ. सुधीर राऊत, ज्येष्ठ समाजसेवक दीपक नागरगोजे, दत्ता बारगजे, प्राचार्य डॉ. सुवर्णा बेद्रे, ▶▶ उर्वरित पान २ वर




# लिंबागणेश प्राथमिक आरोग्य केंद्राची दैयनीय अवस्था रुग्णाच्या अंगावर कधीही ढासळू शकते

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील जिल्हा परिषद सर्कलचे मुख्य बाजारपेठ असलेल्या पंचक्रोशीतील १५ वाड्यांतील गोरगरीबांना आरोग्य सेवा पुरवणाऱ्या ३७ वर्षे पूर्ण झालेल्या लिंबागणेश येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला अवकळा आली असुन पावसाळ्यात मुख्य इमारतीतील



छत खराब झाल्याने गळती लागली असुन रूग्णांची तारांबळ उडत आहे.शस्त्रक्रिया गृहातील लाईट फिटींग नादुरुस्त आणि जीर्ण झालेली असुन नव्याने करण्याची आवश्यकता आहे. तसेच मुख्य इमारतीतील टायलेट ब्लॉकेज असुन रूग्णांची गैरसोय होत आहे. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्राचा विद्युत पुरवठा सातत्याने खंडीत होत असुन सिंगल फेजची जोडणी करण्यात यावी यासह प्राथमिक आरोग्य केंद्रातील निवासस्थानांची दुरावस्था झाली असून त्यांची दुरूस्ती करण्यासाठी निधी उपलब्ध करून तातडीने दुरुस्ती करण्यात यावी तसेच परिचर ५ मंजूर पदापैकी केवळ २ कार्यरत असुन उर्वरित ३ रिक्त पदे भरण्यात यावीत. ▶▶ उर्वरित पान २ वर

# गावठी पिस्टल घेऊन फिरणारा स्थानिक गुन्हे शाखेच्या तावडीत !

**बीड । प्रतिनिधी**

पोलीस अधीक्षक, बीड यांनी स्थानिक गुन्हे शाखा, बीड येथील पोलीस अधिकारी व अंमलदार यांना अवैधरित्या गावठी पिस्टल बाळगणारे इसमानविरुद्ध कारवाई करणेबाबत आदेशीत केले होते. त्यावरून दि. १२/०६/२०२५ रोजी पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांना माहिती मिळाली की, एक इसम नामे जुबेर सय्यद हा त्याचे कमरेला गावठी कट्टा



लावून शाहूनगर येथील हनुमान मंदिराचे बाजूला उभा आहे. अशी खात्रीलायक माहिती मिळाल्यावरून पोलीस निरीक्षक बंटेवाड ▶▶ उर्वरित पान २ वर

# आहेत तोपर्यंत जपा मागे फक्त ठसे राहतात...

बाबा वय झाल्याने तोल जाऊ नये म्हणून भिंतीला धरून चालायचे. ते जिथं जिथं भिंतीला हात लावत त्या ठिकाणाचा भिंतीचा रंग पुसट व मळकट होई. ते पाहून माझ्या बायकोच्या चेहऱ्यावरचे भाव बदलत असताना मी बघत होतो.

त्या दिवशी बाबांचं डोकं दुखत होतं, म्हणून कोण जाणे त्यांनी डोक्याला कोणते तरी तेल लावले होते. त्याच तेलकट हाताने भिंतीला धरून चालल्याने, हाताचे ठसे भिंतीवर उमटले. ते पाहून बायको माझ्यावर जाम भडकली. मला पण काय झालं कुणास ठाऊक मी तडक बाबांच्या रूममध्ये जाऊन म्हणलो बाबा, भिंतीला हात न लावता चाला ना जरा. तुमचे हात लागून त्या किती घाण होतात !

माझा आवाज जरा उंच झाल्यासारखे मला वाटलं. ऐंशी वर्षाचे बाबा, एखादा लहान मुलगा चूक झाली असता जसा चेहरा करतो तसा करुन मान खाली घालून गप्प बसले.

छे! 'हे मी काय केले! मी असं नको म्हणायचं होतं असं वाटायला लागलं माझे स्वाभिमानी बाबा तेव्हापासून मौन झाले. त्यानी भिंतीला धरुन चालणं सोडून दिले. पुढे चार दिवसांनी ते असेच चालत असताना तोल जाऊन पडले. त्यानी अंथरुनच धरले. पुढे दोन दिवसांनी त्यांनी इहलोक यात्रा संपविली. भिंतीवरच्या हाताचे ठसे पाहून मला माझ्या छातीत काही तरी अडकल्या सारखं वाटत राही. दिवस ऊलटत राहिले. माझ्या बायकोला घर रंगवून घ्यावे असे वाटू लागले. पेंटर आले सुद्धा. माझा मुलगा जितूला आजोबा म्हणजे प्राण प्रिय. भिंती रंगविताना आजोबांच्या हाताच्या ठशांना सोडून भिंत रंगविण्याचा हट्टच धरला त्याने. शेवटी ते रंगकाम करणारे म्हणाले, सर, काही काळजी करू नका. त्या ठशाच्या भोवती गोल करून छान डिजाईन काढून देतो. तुम्हालाही ते आवडेल. शेवटी मुलाच्या हट्टापुढे काही चालले नाही. पेंटरने ठसे व्यवस्थित ठेवून भोवतीने सुंदर डिजाईन करून दिले.



पेंटरची आयडिया घरातील आणि घरी येणार्या पाहुणे, मित्रमंडळींना पण आवडली. ते या कल्पनेची खूप स्तुती करून जाऊ लागले. आता पुढे जेव्हां भिंती रंगवण्याचे काम होत गेले तेव्हां त्या हाताच्या ठशाभोवतीचे डिजाईन बनविले जाऊ लागले.सुरुवातीला मुलाच्या हट्टा पायी हे करत राहिलो तरी आमचंही समाधान होई.

२ दिवस, महिना, वर्ष पुढे सरकत चालले. मुलगा मोठा होऊन त्याचं लग्न झालं तसा मी माझ्या बाबांच्या स्थानावर येऊन पोहचलो. बाबांच्या एवढा नसलो तरी सत्तरीला येऊन लागलो. मलाही तोल जाऊ नये म्हणून भिंतीला धरून चालावं वाटू लागलं व मला आठवू लागलं, किती चिडून बोललो होतो बाबांना!

म्हणून चालताना भिंतीपासून थोडं अंतर ठेवूनच चालू लागलो. त्या दिवशी रूम मधून बाहेर पडत असताना थोडासा तोल गेल्यासारखं झाल्याने आधार घेण्यासाठी भिंतीकडे हात पसरणार तोच मी माझ्या मुलाच्या मिठीमध्ये असल्याचे जाणवलं. अहो बाबा! बाहेर येताना भिंतीला धरून यायचं? आता तुम्ही पडता पडता थोडक्यात वाचला ! मुलाचे वाक्य कानावर पडले. मी जितूच्या तोंडाकडे पाहत राहिलो. त्याच्या चेहऱ्यावर चिंता होती पण राग नव्हता. जवळच्या भिंतीवर मला बाबांचे हात दिसले. माझ्या डोळ्यापुढं बाबांचं चित्र उभं राहिलं. त्या दिवशी मी ओरडून बोललो नसतो तर बाबा अजून जगले असते असे वाटू लागले.आपोआप डोळ्यात पाणी साचले. तेवढ्यात आठ वर्षाची नात धावत आली.

आजोबा, आजोबा! तुम्ही माझ्या खांद्यावर हात ठेवून चला म्हणत हसत हसत माझे हात आपल्या खांद्यावर घेऊन निघाली. हॉलमधील सोफ्यावर बसलो असता नातीने आपलं ड्रॉईंगबुक दाखवत, आजोबा! आज क्लासमध्ये ड्रॉईंग परीक्षा झाली मला फर्स्ट प्राईझ मिळालं असे म्हणाली. हो का? अरे व्वा! दाखव बघू कोणतं ड्रॉईंग आहे? म्हटल्यावर तिने ड्रॉइंगचं पेज उघडून दाखविलं. भिंतीवरच्या बाबांच्या हाताचे चित्र आहे तसं काढून भोवतीने सुंदर नक्षी काढली होती. आणि म्हणाली, टीचरनी हे काय आहे म्हणून विचारले. मी सांगितले माझ्या बाबांच्या आजोबांच्या हाताचे चित्र आहे. आमच्या घरच्या भिंतीवर हे चित्र कायमचं कोरून ठेवलंय. टीचर म्हणाल्या, मुले लहान असताना भिंतीभर रेघोट्या, हातापायाचे चित्र काढत राहतात. मुलांच्या आईबाबाना त्यांचं कौतुक वाटतं. त्यामुळे मुलांवर त्यांचं प्रेमही वाढत राहतं. टीचर आणखी म्हणाल्या, आपण पण वयस्कर आई वडील, आजी आजोबावर असेच प्रेम करत राहायला पाहिजे. त्यानी व्हेरी गुड श्रिया असे म्हणून माझे कौतुक केले.

श्रिया (आमची नात ) गोड गोड बोलत राहिली तेव्हां माझ्या नाती पुढे मी किती लहान आहे असं वाटू लागलं. मी माझ्या रूममध्ये आलो. दरवाजा बंद केला आणि बाबांच्या फोटो पुढे येऊन मला क्षमा करा बाबा असे म्हणत मन हलकं होई वरचेवर रडत बाबांची क्षमा मागत राहिलो ...... ! आई-बाबांना जपा एक दिवस आपण ही त्यांच्या जागी असणार आहोत

पान ४ वरून पुढे...

## अमृत जल...

उपयोगात नसल्यामुळे अजूनही उपयोगशील आहेत का ? याची तपासणी करण्यात यावी. शुद्ध पिण्याच्या पाण्याचा पुरवठा घरोघरी नियमितपणे कधी होणार.? बीड शहर बचाव मंचाच्या टीमने नुकतीच बीड शहरातील बऱ्याच भागांमध्ये अमृत जल योजनेअंतर्गत बांधण्यात आलेल्या विस्तारीत पाण्याच्या टाक्या व पाणीपुरवठा नळ योजनेची पाहणी केली. बऱ्याच कालावधीपासून इन्फ्रास्ट्रक्चर पूर्ण तयार झालेले असून सुद्धा अमृत जल योजना कार्यान्वित का केली जात नाही..? हा बीड च्या जनतेपुढे पडलेला फार मोठा प्रश्न आहे. केंद्र शासनाकडून शेकडो कोटी रुपये या योजनेसाठी पुरविण्यात आले. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व नगरपालिका प्रशासन अशा संयुक्त पद्धतीने ही योजना राबविण्यात आली. नगरपालिकेकडून योजना हस्तांतरित करून घेऊन मोठ्या थाटामाटात त्या योजनेअंतर्गत बांधण्यात आलेल्या विस्तारीत पाण्याच्या टाक्यांचे उद्घाटन सोहळे करण्यात येऊन लोकार्पण करण्यात आले. हजारो हजारो घरांना निळ्या पाईपचे कनेक्शन्स देण्यात आले. पाणी पुरवठ्याचे ट्रायल्स' देण्यात आले. या योजनेतून दिलेले नळ घरोघर आज निकामी पडून आहेत. अशाप्रकारे एका मोठ्या जलपुरवठा योजनेचे वाटोळे जर बारामती मध्ये किंवा पुणे जिल्ह्यामध्ये झाले असते तर माननीय पालक'मंत्री अजित दादा आपण हे असेच सहन केले असते का ? असा प्रश्न बीड शहरातील जनतेच्या वतीने बीड शहर बचाव मंच' आपल्यासमोर मांडत आहे. अमृत जल योजना शेकडो कोटी रुपये खर्च करून देखील अयशस्वी झाली . केंद्र शासनाच्या शेकडो कोटी रुपयांचा नासाडा करण्यात आला. फार मोठा भ्रष्टाचार या योजनेत झाला आहे,याची शक्यता नाकारताच येत नाही. ही योजना योग्य पद्धतीने प्रामाणिकपणे राबवण्यात आली असती तर बीडच्या जनतेचा पिण्याच्या पाण्याच्या पुरवठ्याचा प्रश्न कधीच सुटला असता व बीडकरांना पाण्यासाठी वणवण हिंडावे लागले नसते. दरवर्षी उन्हाळ्यामध्ये पिण्याच्या पाण्याची होणारी भीषण टंचाई थांबवण्यात यश आले असते आणि बीडच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सुटला असता यात काहीच शंकाच नाही. अशाच प्रकारे भुयारी गटार

पान ४ वरून पुढे...

योजनेसाठी देखील मोठ्या प्रमाणामध्ये शासनाकडून निधी आलेला होता. भुयारी गटार योजना कुठ आहे? त्यासाठी मिळालेला निधी कुठे गेला..? भुयारी गटार योजनेच्या अंतर्गत फिल्टर प्लांट उभा करण्यासाठी जमीन घेतली होती व फिल्टर प्लांट उभा करण्यात येणार होता . कुठे आहे तो फिल्टर प्लांट ? त्या फिल्टर प्लांट चे व त्यासाठी खरेदी केलेल्या जमिनीचे काय झाले ? भुयारी गटार योजना कोणी व कशी जिरवली ?? याची जवाबदारी कोणावर आहे? या योजना विकासाच्या कुठल्या टप्प्यावर आहेत, कधीपासून कार्यान्वित होतील, शासनाने जनतेसाठी शेकडो कोटी रुपये खर्च केल्यानंतरही या योजना बारगळत पडल्या आहेत याचा लाभ जनतेला कधीपासून मिळणार याचा खुलासा प्रशासनाकडून व संबंधित नेत्या पुढार्यांकडून तात्काळ करण्यात यावा ही मागणी जनतेच्या वतीने बीड शहर बचाव मंचा कडून करण्यात येत आहे.

## परमेश्वरावर विश्वास...

कोणाची प्रगती पाहिल्यावर आपण त्याच्या पेक्षा मोठी झेप घ्यावी परंतु कोणाविषयी जळाऊ वृत्ती ठेऊ नये, कोणी एखादी गाडी घेतली तर आपण मोठी गाडी घ्यावी, परंतु त्याच्या गाडीवर कोणीही जळू नये हि जळाऊ वृत्ती संपवणे गरजेचे आहे. त्यामुळे अध्यात्म गरजेचे असून शिवभक्ती करणे काळाची गरज आहे शिवभक्ती केल्याने मानवी आयुष्यात आनंद निर्माण होईल व देवावरील भक्ती मुळे वृत्ती माणसातून कमी होईल त्यामुळे श्रद्धापूर्वक शिवभक्ती करा असे प्रतिपादन शिवमहापुराण कथेत प पूज्य प्रदीप मिश्राजी यांनी केले.

## धनंजय मुंडे...

बसस्थानकाचे काम, कृषी महाविद्यालयाच्या रस्त्याला निधी, धम ्पुरी किल्ल्याचे काम यांसह जिल्हा स्तरावर प्रलंबित असणारे किंवा जिल्हा स्तरावरून प्रस्तावित करावयाच्या विविध विकासकामांच्या अनुषंगाने धनंजय मुंडे यांनी सूचना केल्या. यावेळी माजी आ. संजय भाऊ दौंड, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष ॲड. राजेश्वर आबा चव्हाण, अविनाश

पान ४ वरून पुढे...

नाईकवाडे, जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा क्रीडा अधिकारी, पुरातत्व विभागाचे अधिकारी, यांसह आदी उपस्थित होते.

## अर्चनाताई व राज...

आहे. राज पाटील आणि सौ अर्चना राज पाटील हे दाम्पत्य मागील अनेक वर्षांपासून सामाजिक सेवेमध्ये आहे. तिगावचे सरपंच पद राज पाटील यांच्याकडे आल्यापासून या गावाचा कायापालट झाला आहे. या गावात विविध जलसंधारणाच्या गोष्टी राबविण्यात आले आहेत. पाणी आडवा पाणी जिरवा ही संकल्पना पाहिजे असेल तर तीगावाला जायला पाहिजे या गावातील विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येतात, संक्रातीच्या दिवशी अर्चना पाटील यांनी महिलांना साहित्य न वाटता पुस्तक आणि झाडाचे वाटप वाण वाटले हा आदर्श उपक्रम राबवणारी महाराष्ट्रातील पहिली ग्रामपंचायत तिगाव ग्रामपंचायत ठरली आहे. गावात वृक्ष संवर्धनासाठी खूप मोठा पुढाकार घेण्यात आला आहे. अर्चना पाटील आणि राज पाटील यांनी तिगावच्या विकासासाठी स्वतः ला पूर्णपणे झोकून दिल आहे. त्यांनी स्वखर्चातून गावातील विविध वस्त्यांना या अगोदरच रस्ते करून दिलेले आहेत. गावातील सामाजिक सलोखा राखण्यासाठी ते नेहमी अग्रेसर असतात. सर्व जाती-धर्माचे लोक एकत्र गुण्या गोविंदाने नांदतात यामध्ये तिगाव अग्रेसर आहे. या गावाचा कायापालट करण्यासाठी आपण पाहिजे तेवढे प्रयत्न करणार असल्याचे राज पाटील आणि त्यांच्या पत्नी अर्चना पाटील यांनी निर्धार केलेला आहे. त्यांच्या कामाची दखल घेऊन अर्चना राज पाटील यांना या सरपंच सेवा संघाने राज्यस्तरीय आदर्श सरपंच पुरस्कार जाहीर केला आहे. तर राज पाटील यांना वृक्ष संवर्धक मित्र म्हणून पुरस्कार जाहीर केला आहे. या नवरा बायकोचा एकाच व्यासपीठावर भास्करराव पेरे पाटील आणि राज्यातील नामवंत समाजसेवक व राजकारणीच्या हस्ते सत्कार आणि सन्मान होणार आहे. हा सोहळा १५ जून रोजी अहिल्यानगर येथे संपन्न होणार आहे हा पुरस्कार सर्वसामान्य जनतेच्या सेवेची पावती. अर्चना राज पाटील यांना आदर्श सरपंच पुरस्कार मिळाला आहे तर राज पाटील

पान ४ वरून पुढे...

यांना वृक्ष संवर्धक मिंत्र म्हणून पुरस्कार जाहीर झाला आहे. हा पुरस्कार मिळाल्यानंतर सामाजिक कार्यकर्त्यांसाठी दहा हत्तीचे बळ मिळते, पूर्वीही राज्यस्तरीय अनेक पुरस्कार राज पाटील यांना मिळाले आहेत. हा पुरस्कार जनसेवेची पावती आपल्याला मिळत असल्याची भावना ॲडव्होकेट राज पाटील यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलून दाखवली.

## कृषी दुकानदारांनी...

या निवेदनावर संघटनेच्या उपयुवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर सौदागर, जिल्हाध्यक्ष राजू गायके, युवा जिल्हाध्यक्ष दिनकर रिंगणे,तालुकाध्यक्ष विलास खिसाडे,जयदेव शिंगणे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

दिलेल्या निवेदनात पुढे म्हटले आहे की,चढ्या भावाने होत असलेले विक्री थांबवण्यात यावी, प्रत्येक कृषी आस्थापनेवर खते,बियाणे यांचे भाव फलक लावण्यात यावे,शेतकऱ्यांना खरेदीची पक्की पावती न देणाऱ्या दुकानदारावर कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी, खताचा कृत्रिम तुटवडा निर्माण करण्यात येऊ नये,लिंकिंग प्रमाणे खत विक्री करणाऱ्या दुकानदारावर कार्यवाही करण्यात यावी,बोगस बियाणे खत विक्री करणाऱ्या कृषी दुकानावर कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी या मागण्या करण्यात आल्या आहेत.या सर्व गोष्टीवर लक्ष देऊन नियमानुसार दुकान चालवण्याच्या सूचना तालुका कृषी अधिकाऱ्यांनी देण्यात याव्यात अशी मागणीही करण्यात आली आहे या दरम्यान शेतकरी यांची अडवणूक किंव्हा आर्थिक पिळवणूक झाली तर स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने आंदोलन करण्यात येईल अशा इशारा देण्यात आला आहे.

## हरवलेल्या व्यक्तीबाबत...

रंगाची जिन्स, पांढ-या रंगाचा कुर्ता,पायात सॅन्डल, भाषा मराठी, चेहरा लांबट, अंगाने सडपातळ वर्णनाची आहे. वरील वर्णनाच्या म ुलीची माहिती मिळाल्यास किंवा आढळून आल्यास शिवाजी नगर पोलीस ठाणे बीड यांच्याशी संपर्क साधावा असे शिवाजी नगर पोलीस ठाण्याचे मपोउपनी, एन.जी दामधर यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

पान १ वरून पुढे...

## आ. सुरेश धस...

अखेर जिल्हा प्रशासनालाही दखल घ्यावी लागली. त्यानंतर प्रशासनाने हालचाल सुरू करत पुलाच्या बांधकामाला प्रत्यक्षात सुरुवात केली आहे. सध्या त्या ठिकाणी मातीचा भर टाकण्याचं काम सुरू आहे. विशेष म्हणजे मागील वर्षीच काम दाखवत या पुलाचे कामाचे बिल संबंधित कंत्राटदाराने उचलले होते. नेमके अभियंत्याने या कामाचे बिल कसे दिले याची चौकशीही झाली नाही. आमदार सुरेश धस यांच्याच मतदार संघात बोगस कामांची मोठी लिस्ट असून यापूर्वीही दहा लाखाच्या कामात प्रचंड बोगसगिरी झाल्याची चर्चा होती. शिरूर आष्टी पाटोदा या तालुक्यांचा कारभार सध्याचे प्रभारी अभियंता कृष्णा पानसंबळ यांच्याकडेच होता त्यांच्या काळात झालेली कामे व आता अधिकारी म्हणून तेच मग चौकशी कोण करणार . असा प्रश्न उपस्थित होत असून आमदार सुरेश धस यांच्या लाडक्या कार्यकारी अभियंत्याची चौकशी आमदार धस लावणार का ?

## धनंजय मुंडेंच्या...

घेतली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस भवनचा संपूर्ण परिसर कार्यकर्ते व नागरिकांनी तुडुंब भरून गेला होता. पक्षातील विविध पदाधिकारी कार्यकर्ते त्याचबरोबर आलेल्या नागरिकांची कामे मार्गी लावण्यामध्ये धनंजय मुंडे हे तब्बल चार तास रमले होते. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष ड राजेश्वर आबा चव्हाण, माजी आमदार संजय भाऊ दौंड, ओबीसी आघाडीचे प्रदेशाध्यक्ष कल्याणराव आखाडे, समता परिषदेचे ड सुभाष राऊत, डॉ योगेश क्षीरसागर, बबन गवते, अमर नाईकवाडे, फारुख पटेल, मोईन मास्टर, अविनाश नाईकवाडे यांसह विविध आघाडी, फ्रंटल सेलचे अध्यक्ष, पदाधिकारी आदी उपस्थित होते.

## अर्थमंत्री अजित...

समितीच्या पदाधिकाऱ्यांशी बोलताना धनंजय मुंडे म्हणाले की, महाराष्ट्र राज्य विनाअनुदानित शाळेत काम करणाऱ्या शिक्षकांच्या व्यथा वेदना याची मला जाणीव आहे. कित्येक दिवसापासून नव्हे तर वर्षापासून बिना पगारी काम करताना काय वेदना असतात. त्यांच्या घरची परिस्थिती कशी असते, याची मला चांगली जाणीव आहे त्यामुळे आपल्या सर्व म ागण्या रास्त असून या रास्त मागण्या विधिमंडळात मांडून येत्या पावसाळी अधिवेशनात टप्पा वाढीसाठी आवश्यक निधीची तरतूद करण्यासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित दादा पवार यांच्याशी चर्चा करून निधीची तरतूद व्हावी यासाठी प्रयत्न करणार आहे. जोपर्यंत टप्पा वाढीसाठी आवश्यक निधीची तरतूद होत नाही. तोपर्यंत पाठपुरावा सुरू ठेऊन तुमचा प्रश्न मार्गी लावतो असे आश्वासन माजी कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी विना अनुदानित शाळा कृती समितीचे जिल्हाध्यक्ष आत्माराम वाव्हळ आणि जेष्ठ समाजसेवक डॉ. संजय तांदळे यांना दिले. त्यामुळे येत्या पावसाळी अधिवेशनात वाढीव टप्प्याच्या निधीची तरतूद होऊन

पान १ वरून पुढे...

खूप दिवसांपासून टप्पा वाढीचा असलेला हा प्रलंबित प्रश्न मार्गी लागण्याचे संकेत उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांच्या पाठोपाठ माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी दिल्याने विनाअनुदानित आणि अंशतः अनुदानित शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्यात चैतन्याचे वातावरण तयार झाले आहे.

## घरकुल धारकांनी...

नव्या घरात दिवाळी साजरी करण्यासाठी कुणाला रूपाया देण्याची गरज नाही असे आवाहन गटविकास अधिकारी बागलाने यांनी सांगितले.

## शासकीय अभिलेखात...

मालमत्ता क्रमांकाचे तेवढ्याच क्षेत्रफळावर विष्णुपंत लिंबाजी शिंदे यांचे नाव रजिस्ट्री क्रमांक ४६०७/१९८०असे नव्याने २२/११/१९८०रोजी असे नव्याने दिसुन येते आहे. तसेच नमुना नं.८वरील नोंद १२२/१ सरपंच व तत्कालीन ग्रामसेवक यांनी नजर चुकीने घेतली होती ती रद्द करुन हि ७अ मध्ये नोंद करा असा शेरा मारुन रद्द केल्याचे दिसून येत आहे.यानंतर मालमत्ता क्रं.७अ वर क्षेत्रफळ ३३बाय १६५ माणिक व्यकोंबा राजमाने, विष्णुपंत लिंबाजी शिंदे यांची रजिस्ट्री क्रमांक पण ४६०७/८० दिनांक १९/११/८०(खाडाखोड करण्यात आली आहे) तर २२/०३/२०२४ रोजी माणिक व्यकोंबा राजमाने, विष्णुपंत लिंबाजी शिंदे यांच्या नावाला आवळा मारुन बंडु विष्णुपंत शिंदे, ज्ञानेश्वर विष्णुपंत शिंदे नावाची नोंद दिसत आहे. याचा ठराव ग्रापंच्या सभेत पारीत करण्यात आला.तसेच तक्रारदार बाबासाहेब ज्योतीराम शिंदे यांनी सहाय्यक दुय्यम निबंधक कार्यालय, माजलगाव यांचे पत्र क्रं.नक्कल ब २३३/२०२४दिनांक २९/०३/२०२४ सादर केले असता तेथील अभिलेखातुन आढळून आले होते की, कार्यालयातील १९८०चा दस्त नोंदणी क्रं.२९७० दिनांक ३१/१२/१९८०असुन ४६०६/१९८०ची नोंद नाही.तसेच नमुद आरोपी डी.एस.चव्हाण यांनी पद व अधिकाराचा दुरुपयोग करून २२/०३/२०२४रोजी एकाच ७अ मालमत्ता क्रमांकाच्या दोन पिटीआर निर्गमित करत त्यावर चतु:सिमाच्या वेगवेगळ्या नोंदी केल्या आहेत.यावरुन सेवानिवृत्त ग्रामसेवक डी.एस.चव्हाण यांनी पदाचा गैरवापर करून त्यांच्या अधिकारात असलेल्या शासकीय अभिलेखात खाडाखोड करून बाबासाहेब शिंदे यांची फसवणूक करण्याचे उद्देशाने बनावट दस्तऐवज तयार करून तो खरा म्हणुन वापरला, उपरोक्त सर्व फिर्यादीत नमुद केले आहे.

## महाडीबीटी पोर्टलवर...

२५ टक्के, १० टक्के, ९० टक्के, बहु भूधारक (२ हे.पेक्षा जास्त क्षेत्र ) ४५ टक्के ३० टक्के १५ टक्के ९० टक्के. फायदे - १.ठिंबक तुषार घटकामुळे उत्पादनात व उत्पादकतेत मोठ्या प्रमाणात वाढ होऊन आर्थिक स्तर उंचावण्यास मदत होते. २.पाण्याचा काटेकोर वापर झाल्याने तणांची

पान १ वरून पुढे...

वाढ रोखण्यास मदत होते. ३.सिंचन क्षेत्रात वाढ होईल. जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा.

## जिल्हा प्रशासन...

डॉ चव्हाण यांची उपस्थिती होती. सविस्तर वृत्त असे की महाराष्ट्र आरोग्य विभाग अंतर्गत व बीड जिल्हा रुग्णालयात गेल्या ३० वर्षापासून विविध पदावर काम करत असलेल्या मेट्रन सौ.रमा गिरी यांना उत्कृष्ट रुग्ण सेवा २०२५ चा सर्व उत्कृष्ट मानला जाणारा आरोग्य विभागाचा पुरस्कार कोल्हापुर येथे राज्याचे आरोग्य मंत्री आंबेटकर यांच्या हस्ते देण्यात आला. बीड जिल्हा आरोग्य विभागाला हा पुरस्कार मिळाल्याने आज जिल्हा रुग्णालय व जिल्हा प्रशासनाच्या वतीने भव्य दिव्य सत्कार सोहळा आयोजित केला होता. या सत्कार सोहळ्या ला जिल्हा प्रशासनाचे उपजिल्हाधिकारी स्वामी यांची उपस्थिती होती. ते पुढे बोलताना असे म्हणाले की रमा आणि मी ४० वर्षांपूर्वी वर्गमित्र होतो. आज मी जिल्हा प्रशासनात अधिकारी म्हणून काम करत आहे पण तिची रुग्णसेवा आणि पुरस्कार पाहता माझ्यापेक्षाही ती ग्रेटच आहे. त्यांनी बालपणीच्या मैत्रिणीच्या आठवणींना उजाळा दिला. तर बीड जिल्ह्यातील चांगलं कार्य करणाऱ्या व्यक्तींना प्रसार माध्यमांनी प्रसिद्ध द्यावी आणि दिली पाहिजे. बीड जिल्ह्यात अशा चांगल्या घटनाना प्राधान्य द्यावे. अशी जिल्हाभरातील प्रसार माध्यमांना त्यांनी साद घातली. तसेच या कार्यक्रमाला जिल्ह्यातील जेष्ठ समाजसेवक शांतीवन प्रकल्पाचे संचालक- दीपक काका नागरगोजे, आणि इन्फंट इंडिया आनंदवनचे -दत्ता बारगजे यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती. ज्येष्ठ समाजसेवक दीपक काका नागरगोजे यांनी आपल्या भाषणात बोलताना एक रमाई देशाची आई झाली तर दुसरी रमाई महाराष्ट्राची ताई झाली. असे उद्गार काढले व या आरोग्य सेवेचा सन्मान केला. जिल्हा रुग्णालयाचे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय राऊत यांनी आपल्या भाषणात बोलताना असे सांगितले की *आरोग्य विभागातील सर्व उत्कृष्ट पुरस्कार आपल्या बीड जिल्ह्याला मिळाला सन्मान हा माझ्यासाठी तुमच्यासाठी सर्वांसाठी मोठा आहे*. यावेळी सर्व उपस्थित स्टाफ नर्स यांनी सत्कारमूर्ती यांचे अभिनंदन व शुभेच्छा पुष्पगुच्छ देऊन केले.या वेळी अनेक स्टाफ नर्स यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तर या सर्व कार्यक्रमाच्या सत्कारमूर्ती मेट्रन- रमा गिरी यांनी कार्यक्रमाला संबोधित केले.या वेळी प्रमुख उपस्थित बीड जिल्ह्या आरोग्य अधिकारी विलास गंडाळ, उपमेट्रन - संगीता महानवर ,मोरे मॅडम,सुनिता पाटील मॅडम, डॉ.हनुमंत पारखे, डॉ. लक्ष्मीकांत तांदळे, रंजना दाणे,पल्लवी गिराम,शीतल पाटील, सुषमा साबळे,नीता मस्के,ससाणे श्रीपाल, बाप्पू निकाळजे तसेच जिल्हा आरोग्य विभाग प्रमुख, सर्व इन्चार्ज स्टाफ नर्स, नर्सिंग विद्यार्थी विद्यार्थिनी यांची मोठी उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मते सर, आभार प्रदर्शन शितल /धुळे पाटील यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजन श्रीमती सुनिता पाटील मॅडम, बापू निकाळजे व ससाने श्रीपाल यांनी केले.

पान १ वरून पुढे...

## लिंबागणेश प्राथमिक...

अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी बीड डॉ.उल्हास गंडाळ यांना केली आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचारी यांना बांधण्यात आलेल्या निवासस्थानांची दुरावस्था झाली असुन पावसाळ्यात पाणी गळती होते. दरवाजे खिडक्या मोडकळीस आलेल्या आहेत.लाईट फिटींग ठिकठिकाणी उखडलेल्या अवस्थेत असुन नादुरुस्त आहे.टायलेट आउटलेट ब्लॉकेज असल्याने अधिकारी आणि कर्मचारी यांची गैरसोय होते. फरश्या तुटलेल्या अवस्थेत आहेत.आणि निवासस्थानांची रंगरंगोटी करण्याची आवश्यकता आहे. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रातील ५ मंजुर पदापैकी केवळ २ कार्यरत असुन ३ परिचर पदे रिक्त असुन त्यामुळे मनुष्यबळावर मानसिक व शारीरिक ताण येत असुन रिक्त पदांची नियुक्ती करण्यात यावी. अशी मागणी डॉ.गणेश ढवळे यांनी केली आहे.

प्राथमिक मुख्य इमारतीतील आणि निवासस्थानांच्या असुविधेबाबत जिल्हा आरोग्य अधिकारी यांना पत्रव्यवहार केला आहे : डॉ.रूपाली चिटकुलवार ( वैद्यकीय अधिकारी प्रा.आ.केंद्र लिंबागणेश)

लिंबागणेश प्राथमिक आरोग्य केंद्राची मुख्य ईमारत आणि निवासस्थानी असणाऱ्या असुविधा जसे की पावसाळ्यात छताची गळती, शस्त्रक्रिया गृहात व ईतर ठिकाणी नादुरुस्त लाईट फिटींग, वारंवार खंडित विद्युत पुरवठा, टॉयलेट आउटलेट साठी सिमेंट टाकी नसल्यामुळे टॉयलेट ब्लॉक झालेला आहे. दारे खिडक्या तुटलेल्या अवस्थेत असुन रंगरंगोटीची आवश्यकता असल्याचे पत्राद्वारे जिल्हा आरोग्य अधिकारी बीड यांना पत्रव्यवहार केल्याचे प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी डॉ. रूपाली चिटकुलवार यांनी सांगितले.

## गावठी पिस्टल...

यांनी एक पथक सदर ठिकाणी पाठवून खात्री केली असता एक इसम तेथे मिळून आला. त्याला त्याचे नाव गाव विचारले असता त्याने जुबेर जावेद सय्यद, वय १८ वर्ष रा. हनुमान चौक, शाहूनगर, बीड असे सांगितले. पोलीस पथकाने त्याची अंगझाडती घेतली असता त्याचे कमरेला गावठी कट्टा मिळून आला. सदर इसमाविरुद्ध पोलीस स्टेशन शिवाजीनगर गुरन ३३०/२०२५ कलम ३/२५ शस्त्र अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला असून पुढील तपास पोलीस स्टेशन शिवाजीनगर व स्थानिक गुन्हे शाखा करत आहे. सदरची कामगिरी ही मा.पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक पांडकर, पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि श्रीराम खटावकर, पोह/अशोक दुबाले, सोमनाथ गायकवाड, पोना/ बाळु सानप, पोकॉ/अर्जुन यादव, अश्विनकुमार सुरवसे, चालक/सिध्देश्वर मांजरे, नेम. स्थानिक गुन्हे शाखा, बीड यांनी केलेली आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

## थोडक्यात

### जेएनयू विद्यापीठाच्या न्यायालयीन समितीवर खा. रजनीताई पाटील यांची निवड

**मुंबई । प्रतिनिधी**



दिल्ली येथील जवाहरलाल नेहरू विद्यापीठाच्या न्यायालयीन समितीच्या सदस्यपदी काँग्रेसच्या राज्यसभा खा रजनीताई अशोकराव पाटील यांची निवड झाली. राज्यसभेच्या अध्यक्षांनी सदस्यत्वाचे मानांकीत केले आहे. जगातील काही प्रमुख विद्यापीठांपैकी महत्वाच्या आणि वैचारीक म्हणून ओळख असलेल्या जेएनयू विद्यापीठाच्या न्यायालयीन सदस्यपदावर खा रजनीताई पाटील,डॉ.सुधांशू त्रिवेदी, डॉ. सस्मित पात्रा ,डॉ. अशोक कुमार मित्तल आदींची निवड करण्यात आली आहे. समिती समन्वय विभागाचे महासचिव पी सी मोडी यांनी याबद्दल अभिनंदन केले आहे. जे एन यु विद्यापीठात माझे शिक्षण झाले त्याच विद्यापीठाच्या न्यायालयीन समितीवर काम करण्यास विशेष आनंद आहे. विद्यार्थ्यांच्या न्यायासाठी काम करत राहणार असल्याचे खा पाटील यांनी सांगितले.

### ईश्वर लक्ष्मण धनवे याचा अटकपूर्व जमीन नामंजूर: ॲड तेजस वडमारे

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील मोढा भागातील चर्चित लहू पावळे यांना जीवे



मारण्याच्या उद्देशाने केलेली मारहाण प्रकरनातील आरोपी ईश्वर धनवे याचा अटकपूर्व जामीन अर्ज नामंजूर केला. या बाबत सविस्तर वृत्त असे कि दिनांक ०३/०३/२०२५ रोजी रात्री १०:०० वाजण्याच्या सुमारास लहू रामा पावळे किरकोळ कारणा वरून आरोपी परमेश्वर धनवे, ईश्वर धनवे, राकेश धनवे, राजू धनवे, योगेश जावळे, बाळू धनवे, अजय जावळे व इतर लोकांनी संगणमत करून फिर्यादी लहू पवळे यांना घरातून फरफटत बाहेर काढून लाथाबुक्क्याने मारहाण करत राजू धनवे याने जीव घेण्याच्या उद्देशाने लहू पवळे यांच्या मानेवर तलवारीने वार केला असता तो फिर्यादी लहु यांनी चुकवला व परमेश्वर धनवे याने त्याची मोटारसायकल भरधाव वेगात जीव घेण्याच्या उद्देशाने फिर्यादी लहू पवळे याच्या अंगावर घातली त्यामुळे त्याच्या उजव्या पायाला गंभीर स्वरूपाची दुखापत झाली व अधिक रक्तस्त्राव होऊन फिर्यादी लहु पवळे बेशुद्ध झाला, त्यानंतर फिर्यादी लहु पवळे यांच्या जवाबा वरून दिनांक १०/०३/२५ रोजी पेठ बीड पोलीस ठाणे बीड येथे वरील आरोपी विरुद्ध गु. र. नंबर ७३/२०२५, भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १०९, ११५(२),११८(२),३३३,३५१(२),३५२,१८९ (२),१९१(२)१९१(३),१९०,व शस्त्र अधिनियम ४/२५ प्रमाणे गुन्हा दाखल केला होता. आरोपी नामें ईश्वर धनवे याने अटकपूर्व जामीन मिळवण्याकारिता मा सत्र न्यायालय बीड येथे धाव घेत जामीन अर्ज क्रमांक ४९८/२०२५ दाखल केला होता, सदर प्रकारणात फिर्यादी यांनी ड तेजस वडमारे याच्या मार्फत जामीन अर्जावर आक्षेप घेतला,दोन्ही पक्षाचे युक्तिवाद ऐकून मा. सत्र न्यायाधीश साहेब बीड यांनी फिर्यादी च्या वतीने ॲड तेजस वडमारे यांनी दाखल केलेले जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र,आरोपिंची गुन्हेगारी पार्श्वभूमी दर्शवणारे कागदपत्र व फिर्यादीची बाजू भक्कम पणे मांडून फिर्यादीच्या वतीने प्रभावशाली केलेला युक्तिवाद ग्राह्य धरून आरोपीचा अटकपूर्व जामीन नामंजूर केला या प्रकरणावर पेठ बीड भागातील नागरिकांचे लक्ष लागलेले होते, या प्रकरणात ॲड तेजस वडमारे यांना ॲड फारुख शेख, ॲड राहुल सोळंके यांनी सहकार्य केले.

### शासनाने निर्धारित केलेल्या नियम नुसार शाळा भरवा - मनोज जाधव

**बीड । प्रतिनिधी**



शासनाने निर्धारित केलेल्या नियमांचे बीड मधील इंग्रजी शाळा पालन करत नाहीत. या संदर्भात शिक्षण विभागाला वारंवार निवेदनाद्वारे मागणी करूनही शिक्षण विभाग ही या शाळांवर कसलीही कारवाई करत नाही. शासन निर्णयानुसार शाळा सकाळी ९ वाजता भरवणे बंधनकारक आहे. शाळांच्या वेळा साडेपाच तासांपेक्षा अधिक असू नयेत, असा नियम असताना देखील नियमाची पायमल्ली केली जात आहे आणि शिक्षण विभागा कडून कसलीही कारवाई होत नसल्याने शाळांची मनमानी सुरूच आहे. तेव्हा शिक्षण विभागाने मनमानी करणाऱ्या शाळांवर कारवाई करण्याची मागणी शिवसंग्रामचे युवा नेते तथा आरटीई कार्यकर्ते मनोज जाधव यांनी केली आहे. शाळा भरण्याची वेळ आणि शाळांच्या तासिकेच्या वेळा याची शासन निर्णयानुसार सांगड घालने गरजेचे आहे. जेणे करून शासन जो शाळेच्या वेळांमध्ये सुसूत्रता आणण्याचा प्रयत्न करत आहे ते उद्दिष्ट पूर्ण होईल. मात्र बीडमध्ये शासनाने घालून दिलेल्या नियमापेक्षा शाळेला जेव्हा वाटेल त्यावेळी शाळा भरवली जाते आणि सोडली जाते. या शाळा सहा ते सात तासापर्यंत सुरू ठेवल्या जातात, बीड जिल्ह्यातील शाळांच्या वेळा सकाळी लवकर आणि प्रमाणापेक्षा जास्त असल्याने त्याचा विद्यार्थ्यांच्या मानसिकतेवर आणि स्वास्थ्यावर विपरीत परिणाम करणाऱ्या आहेत. त्यामुळे शाळांच्या वेळाची सांगड घालणे गरजेचे आहे. जेणेकरून शिक्षण हे विद्यार्थ्यांसाठी आनंददायी व्हावे यासाठी शिक्षण विभागाने प्रयत्न केला पाहिजे असे मनोज जाधव यांनी म्हटले आहे.

### अंबाजोगाई नगर परिषदेच्या ढिसाळ कामकाजाबद्दल तीव्र नाराजी व्यक्त करत...

# नागरिकांच्या प्रश्नावर राजकिशोर मोदींनी मुख्याधिकाऱ्यांना धरले धारेवर

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**



शहराच्या नागरी समस्यांबाबत प्रशासनाची उदासीनता संपण्याचे नाव घेत नसल्याने अखेर माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी पुढाकार घेत महत्त्वपूर्ण मुद्द्यांवर आधारित मागण्यांचे पत्र आज नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना सादर केले. यावेळी मोदी यांनी शहरातील नागरी सोयीसुविधांच्या दुरावस्थेबद्दल मुख्याधिकाऱ्यांना जाब विचारत शहरहितासाठी अनेक तत्त्वपूर्ण मागण्या मांडल्या.

शहरातील सांस्कृतिक व नागरी वापराच्या जागांच्या पारदर्शकतेबाबत प्रशासकीय भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत, आद्यकवी मुकुंदराज सभागृह, लोकनेते विलासराव देशमुख सभागृह, एपीजे अब्दुल कलाम सभागृह, सदर बाजारमधील शादी खाना, मुकुंदराज शाळेसमोरील नगरपालिका संकुले सभागृह तसेच एलआयसी ऑफिस मागील स्विमिंग पूल ओपन स्पेस या ठिकाणी भाडेतत्त्वावर चालविल्या जाणाऱ्या व्यवस्थांचा तपशील जाहीर करण्याची स्पष्ट मागणी करण्यात आली आहे. विशेषतः २०१६ सालच्या दरपत्रकांपासून ते आजतागायतचे दर, सामान्य जनतेसाठी आयोजीत कार्यक्रमांना आकारण्यात येणारे भाडे, तसेच यासंबंधित सर्व कागदपत्रांची सत्यप्रती तात्काळ जनतेसमोर सादर करण्यात याव्यात, अशी आग्रही भूमिका पत्रात मांडण्यात आली आहे.यासोबतच नगर परिषद सर्व विभागांचे वीजबिल भरते का? भरल्यास त्यावर होणारा एकूण खर्च किती आहे, याची माहितीदेखील मागविण्यात आली आहे. राजकिशोर मोदी यांच्या नेतृत्वात सादर करण्यात आलेल्या या मागण्यांमुळे प्रशासनासमोर अनेक अनुत्तरित प्रश्न उभे राहिले असून, मागण्यांची पूर्तता लवकरात लवकर न झाल्यास जनआंदोलन छेडले जाईल असा स्पष्ट इशारा यावेळी देण्यात आला. हे निवेदन देतांना मनोज लखेरा, महादेव आदमाणे, अमोल लोमटे, दिनेश भराडीया, सुनील वाघाळकर , धम्मा सरवदे, सय्येद रशिद, अशोक गंडले,शाकेर काझी, अंकुश हेडे, सचिन जाधव, जावेद गवळी, सय्येद ताहेर, दत्ता सरवदे, खलील जाफरी, महेबूब गवळी, आकाश कऱ्हाड, अजीम जरगर, यांच्यासह कंत्राटी कामगार मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

### गटविकास अधिकारी यांच्या आश्वासनानंतर...

## युधाजित पंडित यांच्या हस्ते पाणी पिऊन बाळू तोडेकर यांनी उपोषण सोडले

### सरपंच, ग्रामसेवक, अभियंत्यावर होणार कारवाई

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील भडंगवाडी येथील मनरेगा अंतर्गत गाय गोठा व जलसिंचन योजनेतील विहीर या वैयक्तिक लाभाच्या योजनेची रक्कम परस्पर उचलली असल्याकारणाने यामध्ये झालेल्या भ्रष्टाचाराची चौकशी करून संबंधितावर ठोस कारवाई करावी या मागणीसाठी येथील शेतकरी बाळू तोडेकर हे ९ जून २०२५ पासून अमरण उपोषणाला बसले होते. याबाबत बीड जिल्हा परिषदेचे माजी अर्थाने बांधकाम सभापती युधाजित पंडित, युवा नेते यशराज पंडित यांनी त्यांची तात्काळ भेट घेतली आणि गटविकास अधिकारी पंचायत समिती गेवराई यांच्याशी चर्चा केली. मागणी मान्य करून योग्य ती कारवाई केली जाईल असे



गट विकास अधिकारी कांबळे मॅडम यांनी आश्वासन दिल्यानंतर शेतकरी बाळू तोडेकर यांनी तिसऱ्या दिवशी म्हणजे ११ जून २०२५ रोजी उपोषण सोडले.

याबाबत गटविकास अधिकारी कांबळे मॅडम यांनी बाळू तोडेकर यांनी केलेली मागणी मान्य करत त्याबाबत योग्य ती कारवाई केली जाईल असे आश्वासन दिले. तसेच याबाबत नियुक्त करण्यात आलेल्या समितीने अहवाल दिला नसल्याचा ठपका ठेवून, यातील श्रीमती व्ही एम सासवडे शाखा अभियंता, श्री माळतकर अरविंद सहाय्यक कार्यक्रम अधिकारी, महादेव येवले ऑपरेटर आणि श्री वादक यांचेवर मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांनी कारवाई करण्यासंदर्भात मागणी करण्यात आली आहे. या आश्वासनानंतर माजी सभापती युधाजित पंडित यांच्या हस्ते पाणी पिऊन बाळू तोडेकर, विष्णू धनाडे, नारायण धराडे, बजरंग निकम या शेतकऱ्यांनी आपले उपोषण मागे घेतले. यावेळी युवा नेते यशराज पंडित, महादेव औटी, कैलास माने, सरपंच बंडू पवार, शेख शहेदाद, अतुल खरात, उज्वल सुतार, आप्पासाहेब चव्हाण, सरपंच राऊत आधी सह कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते.

### पोलिस व्हॅन व खासगी वाहनांमधून वाहतूक केलेले बॉक्स कशाचे खुलासा करा

## पोलिस अधिक्षक नवनीत सर यांच्याकडे वंचितचे अजय सरवदे यांची तक्रार

**बीड । प्रतिनिधी**

दि. १२.०६.२०२५ रोजी मध्यरात्री १ वाजून १५ मिनिटांनी बीडमधील छत्रपती शिवाजी महाराज चौका पासून फक्त २ किलोमीटर अंतरावर सोलापूर हायवेवर क्झ पेट्रोल पंपासमोर एका पोलिस व्हॅनमधून एका खाजगी गाडीत जिचा नंबर चक्र३धा७९३ मध्ये पोलिस ४ ते ५ बॉक्स उतरवून पोलिस गाडी घेऊन गेले आणि ती खाजगी गाडी पण माल घेऊन त्यांच्या १० मिनिटाने निघून गेली. पोलिस व्हॅनमध्ये नेमके काय होते ? जे इतक्या रात्री एका खाजगी गाडीत द्यावे लागले ? ती पोलिस व्हॅन कुठली होती ? याची चौकशी बीड पोलिस अधिक्षक करतील का ? असा प्रश्न सर्वसामान्य नागरिक विचारत आहे. या अगोदरही गोव्याची दारू पोलिसच्या व्हॅनमध्ये दारू बॉक्स, गुटखा बॅग बीडमध्ये पोहच केल्या जातात या गोष्टी एवढ्या गोपनीय केल्या जातात की पोलीस व्हॅन म्हटल्यानंतर कोणी जास्त लक्ष देत नाही. तसेच कोणी हटकल्यानंतर त्याला पॉलिसी खाक्या दाखवल्या जातात त्यामुळे या अगोदर कुणी तक्रार घेऊन पुढे आले नाही. पाथर्डी मार्गे औरंगाबादला जाणारे कपिल सरोदे यांनी घडलेला प्रकार त्यांच्या मोबाईलमधे कैद केला व सोशल मीडियावर टाकला आहे आता बीड पोलिस अधिक्षक नवनीत सर यांनी प्रकरणाची सखोल चौकशी करून कारवाई करत खुलासा करतील का ? हा प्रश्न निर्माण झाला आहे.

## फसव्या घोषणा करुन सत्तेवर बसलेल्या महायुतीच्या सरकारला स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत त्यांची जागा दाखवा: जिल्हाप्रमुख गणेश वरेकर

**बीड । प्रतिनिधी**

पक्षप्रमुख उद्धवसाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार व शिवसेना सचिव विनायक राऊत साहेब,संपर्क नेते सुनिल प्रभु साहेब,विरोधी पक्षनेते अंबादास दानवे साहेब व जिल्हा संपर्कप्रमुख परशुराम जाधव साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली आज बीड जिल्हा उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर यांच्या नेतृत्वाखाली व बीडचे तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन, वडवणीचे तालुकाप्रमुख विनायक बप्पा मुळे ,धारुरचे तालुकाप्रमुख बाबा सरामफ ,व माजलगावचे विधानसभा प्रमुख नामदेव सोजे पाटील यांच्या प्रमुख



उपस्थितीत महाराष्ट्र शासनाने केलेल्या फसव्या घोषणांच्या विरोधात बीड शहरातील अण्णाभाऊ साठे चौकात भव्य चक्का जाम आंदोलन करण्यात आले. या आंदोलनामुळे साठे चौक परिसरात वाहनांच्या भल्या मोठ्या रांगा लागल्या होत्या.

या चक्का जाम आंदोलनाला उपजिल्हाप्रमुख रामराजे सोळंके,तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन बीड , तालुकाप्रमुख विनायक बप्पा , धारुरचे तालुकाप्रमुख बाबा सराफ ,जिल्हासहसचिव श्रीकृष्ण गायके ,युवराज मामा शिंदे,वडवणी मुळे , माजलगावचे विधानसभाप्रमुख नामदेव सोजे पाटील, धारुरचे तालुकाप्रमुख बाबा सराफ यांच्यासह पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संपादक शेख मुजीब यांना पत्रकारितेचा मराठवाडा भूषण पुरस्कार जाहीर

## महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचा पहिला पुरस्कार रविवारी मान्यवरांच्या हस्ते होणार वितरण

**बीड । प्रतिनिधी**

पत्रकारितेच्या माध्यमातून गेली १२ वर्ष म्हणजेच तब्बल एक तप सर्वसामान्यांच्या प्रश्नांवर बेधडक लेखनी चालवणार्या आणि वंचित, उपेक्षित घटकांना सातत्याने न्याय देण्याची भुमिका ठेवणार्या सायं.दै.बीड सिटीझनच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. सायं.दै. सिटीझनचे संपादक शेख मुजीब शेख खाजा यांना महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्या वतीने पत्रकारितेतील पहिला दर्पणकार मराठवाडा भुषण २०२५ पुरस्कार जाहीर झाला आहे.

रविवार दि.१५ जुन रोजी छत्रपती संभाजीनगर येथे मान्यवरांच्या उपस्थितीत होणार्या सोहळ्यात पुरस्कार प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती पत्रकार संघाचे प्रदेश संपर्क प्रमुख वैभव स्वामी यांनी दिली आहे.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई मराठवाडा विभागाच्या वतीने पत्रकार संघाचे मराठवाडास्तरीय रौप्य महोत्सवी अधिवेशन आणि मराठवाडा भुषण पुरस्कार सोहळा २०२५ चे आयोजन रविवार दि.१५ जुन रोजी सकाळी १० वाजता छत्रपती संभाजीनगर येथील संत एकनाथ रंग मंदीर उस्मानपुरा येथे करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे उद्घाटन राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय सिरसाट यांच्या हस्ते होणार असून प्रमुख पाहुणे म्हणून प.पु.१००८ महामंडलेश्वर शांतीगिरी महाराज, नांदेडचे पालकमंत्री अतुल सावे, जालन्याच्या पालकमंत्री पंकजाताई मुंडे, हिंगोलीचे पालकमंत्री नरहरी झिरवाळ, परभणीच्या पालकमंत्री मेघनाताई बोर्डीकर, राज्यसभेचे खा.डॉ.भागवत कराड, शिवसेना नेते चंद्रकांत खैरे, आ.प्रदिप जैस्वाल, आ.प्रशांत बंब, आ.संजय केनेकर, आ.संजनाताई जाधव, आ.अनुराधाताई चव्हाण, महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडलाचे अध्यक्ष जयदिप कवाडे, जेष्ठ पत्रकार मधुकरआण्णा वैद्य, माजी महापौर नंदकुमार घोडेले, डिजिटल मिडियाचे प्रदेशाध्यक्ष सिध्दार्थ भोकरे तर विशेष अतिथी म्हणून एबीपी माझ्याच्या संपादीका सरिताताई कौशिक, प्रसिध्दी अभिनेते योगेश सिरसाट, बंगरूळूच्या पुर्णब्रम्ह प्रशासकीय संचालिका जयंतीताई कठाळे यांची उपस्थिती राहणार आहे. पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष संजय भोकरे, राष्ट्रीय अध्यक्ष अशोक वानखेडे, प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे, प्रदेश सरचिटनीस डॉ.विश्वास आरोटे, प्रदेशउपाध्यक्ष अशोक देडे, प्रदेश संपर्क प्रमुख वैभव स्वामी, राज्यसमन्वयक नितीन शिंदे, प्रदेश प्रसिध्दीप्रमुख नवनाथ जाधव, कार्याध्यक्ष निलेश सोमानी आदि मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

### संपादक शेख मुजीब यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव..



**सायं दैनिक सिटीजनचे संपादक शेख मुजीब यांनी एक टपरी चालक ते दैनिकाचा संपादक असा यशस्वी प्रवास केल्याबद्दल त्यांना महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचा पत्रकारितेमधून दर्पणकार मराठवाडा भूषण २०२५ जाहीर करण्यात आला. शून्यातून विश्व निर्माण करणाऱ्या संपादकाची निवड पत्रकार संघाच्या राज्यकारणीने मान्य केल्याबद्दल पत्रकार संघाच्या बीड जिल्हा शाखेच्या वतीने शाल, श्रीफळ, पेढा भरवून अभिनंदन करण्यात आले. यावेळी पत्रकार संघाचे राज्याचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांच्यासह बीड जिल्हाध्यक्ष अमजद खान, पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे जिल्हाध्यक्ष शेख ताहेर, महिला जिल्हाध्यक्ष शेख आयेशा यांच्यासह ग्रामीणचे बीड जिल्हाध्यक्ष ॲड विनायक जाधव, बीड ग्रामीणचे जिल्हाध्यक्ष दीपक काळकुटे, बीड जिल्हा सचिव शेख वसीम, पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे जिल्हा सचिव शेख अब्दुल, जिल्हा संघटक रईस खान, उपाध्यक्ष शेख आयुब, महिला सचिव अनुप्रिता मोरे, ज्येष्ठ मुक्त पत्रकार युसुफ भाई, ज्येष्ठ समाजसेवक रमेश गंगाधरे यांच्यासह प्रमुख पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले आहे. या निवडीबद्दल जिल्ह्यातील पत्रकारांसह विविध क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनचा वर्षाव होत आहे.**

दैनिक मराठवाडा पत्र
● epaper.marathwadapatra.com
शनिवार, दि.१४ जून २०२५ पान ४

## अमृत जल योजनेची सखोल चौकशी करा: बीड शहर बचाव मंचाची मागणी



**बीड । प्रतिनिधी**

पालक'मंत्र्यांनी या प्रकरणांमध्ये तात्काळ लक्ष घालण्याची गरज आहे. या योजनांची सखोल चौकशी करण्यात यावी. भुयारी गटार योजनेचे काय झाले ? त्यासाठी मिळालेला शेकडो कोटी रुपये निधी कुठे गेला ? कालबाह्य झालेल्या व सर्वदृष्टीने धोक्याच्या असलेल्या पाण्याच्या टाक्यांमार्फतच आजही बीड शहराला पाणीपुरवठा होत आहे. कालबाह्य झालेल्या व अनुषंगाने धोक्याच्या झालेल्या पाण्याच्या टाक्या कधी बंद करणार ? विस्तारित पाण्याच्या टाक्या बांधूनही बराच काळ ▶▶ उर्वरित पान २ वर

# परमेश्वरावर विश्वास ठेवा अंधविश्वास ठेऊ नका : प. पूज्य प्रदीप मिश्राजी



### आज चाकरवाडी येथे शिवमहापुराण कथा व अखंड हरिनाम सप्ताह सांगता होणार

**चाकरवाडी । प्रतिनिधी**

शिव परमेश्वरावर विश्वास ठेवा परमेश्वरावर ठेवलेला विश्वास तुमच्यात आत्मविश्वास निर्माण करेल, त्या आत्मविश्वासाच्या जोरावर तुमच्या आयुष्यात कार्य सिद्धी होईल, परंतु फक्त अंधविश्वास ठेऊ नका. अंधविश्वास तुमच्या आयुष्याच नुकसान करतो. त्यामुळे प्रत्यकाने शिव परमेश्वरावर विश्वास ठेवावा असे प्रतिपादन शिवमहापुराण कथेत प. पूज्य प्रदीप मिश्राजी यांनी केले.

दरम्यान आज शनिवार रोजी चाकरवाडी येथे सुरू असलेला अखंड हरिनाम सप्ताह व शिवपुराण कथेचा सांगता समारंभ होणार आहे. चाकरवाडी येथे विषया शतकातील महान संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या कृपाशीर्वादाने व तपो निधी गुरुवर्य महादेव महाराज चाकरवाडीकर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह व शिवपुराण कथेत प्रदीप मिश्रा बोलत होते बोलत. यावेळी पुढे बोलताना मिश्राजी म्हणाले की, शिव, विष्णू, नारायण, पांडुरंग, कृष्ण, कन्हैया, माऊली दादा महाराज कोणताही नामस्मरण करा सर्व एकच आहे. ▶▶ उर्वरित पान २ वर



● आज होणारे कार्यक्रम – आज दि १४ जून शनिवार रोजी चाकरवाडी येथे विसाव्या शतकातील महान संत सद्गुरु ज्ञानेश्वर महाराज माऊली दादाच्या रौप्यमहोत्सवी सोहळ्यात तपोनिधी शांतीब्रह गुरुवर्य श्री महादेव महाराज तात्या चाकरवाडीकर यांच्या मार्गदर्शनाखाली होत असलेल्या शिवमहापुराण कथेची व अखंड हरिनाम सप्ताह सांगता होणार आहे. श्री प पूज्य प्रदीप मिश्राजी सिहोर वाले यांच्या शिवमहापुराण कथेची सांगता आज सकाळी ८ वा. सुरू होणार आहे. शिव महापुराण कथा संपल्यावर माऊली दादाच्या रौप्यमहोत्सवी सोहळ्यात अखंड हरिनाम सप्ताह मध्ये काल्याचे कीर्तन श्री ह. भ. प संदीपान महाराज हासेगावकर श्री जोग महाराज वरकरी शिक्षण संस्था श्री क्षेत्र आळंदी देहू यांचे ११.३० ते १ वाजेपर्यंत काल्याचे कीर्तन होईल त्या नंतर महाप्रसादाची महापांगत होईल.

● शिवमहापुराण कथेस मुख्य उपस्थिती शंकराचार्य शृंगेरी पीठ मान्यता प्राप्त आचार्य अभिनव विद्या नरसिंह भरती स्वामी महाराज श्री क्षेत्र शृंगेरी हे आपल्या शिष्य गणा समवेत माऊली दादाच्या समाधीच दर्शन घेऊन प पूज्य प्रदीप मिश्राजी यांच्या शिवमहापुराण कथेस उपस्थित राहून कथेस आलेल्या भाविक भक्तांना आशीर्वाद दिले.

● मान्यराची भेट– मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील, माजी मंत्री सुरेश धस, माजी मंत्री अशोक पाटील, खासदार रजनीताई पाटील, खा. बजरंग सोनवणे, माजी नगराध्यक्ष पापा मोदी, अनेक नामांकित दैनिकाचे संपादक,उपसंपादक,वृत्तवाहिनीचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## केज प्रशासनाचे गलांडे यांच्या उपोषणनाकडे दुर्लक्ष; उपोषणाचा सातवा दिवस

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील अतिक्रमण हटविण्यात यावे म्हणून रोहन गलांडे यांनी सात दिवस झाले अमरण उपोषणाला बसले आहेत परंतु जिल्हा परिषद बांधकाम विभागाने अधिकारी,डिप्टी इंजिनिअर मिसाळ व इंजिनिअर पटेल यांनी कुठल्याही प्रकारची कार्यवाही केली नाही याचा अर्थ असा होतो की जिल्हा परिषद बांधकाम विभागांचे अधिकारी मिसाळ व पटेल यांनी रोहन गलांडेला जिव



मारण्याच ठरवले आहे तसेच रोहन गलांडे यांनी म्हटले आहे की मी जर मेलो तर प्रशासन, जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे मिसाळ व पटेल तसेच गटविकास अधिकारी, तहसीलदार , पाटबंधारे विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग केज ,राहील कारण पाच दिवस झाले रोहन गलांडे यांनी कुठल्याही प्रकारचे अन्न घेतले नाही किंवा उपचार घेतले नाहीत त्यामुळे त्याची प्रकृती चिंताजनक झाली आहे जर यदाकदाचित रोहन गलांडे उपोषणा दरम्यान मेला तर जबाबदार कोण असा प्रश्न नागरिकांना पडला आहे परंतु रोहन गलांडे यांनी म्हटले आहे की मी जर मेलो तर जिल्हा परिषद बीड,केज व तहसीलदार,डिप्टी इंजिनिअर मिसाळ, पटेल जबाबदार राहणार आहेत असे रोहन गलांडे यांनी म्हटले आहे.

## धनंजय मुंडे यांनी घेतली जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांची भेट

### परळी मतदारसंघासह जिल्ह्यातील विविध महत्त्वाच्या विषयांवर प्रदीर्घ चर्चा

**बीड । प्रतिनिधी**

माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांनी आज परळी वैजनाथ विधानसभा मतदारसंघातील विविध प्रलंबित कामे, प्रस्ताव यांचा विविध महत्त्वाच्या विषयाच्या अनुषंगाने आज बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांची भेट घेतली. यावेळी दोघांमध्ये परळी मतदान संघातील तसेच



जिल्ह्यातील महत्त्वाच्या विषयांवर प्रदीर्घ चर्चा झाली. शिरसाळा येथील मंजूर एमआयडीसी मधील उर्वरित जागेची अधिकरण प्रक्रिया लवकर पूर्ण करण्यात यावी तसेच या ठिकाणी पायाभूत सुविधा निर्मितीच्या अनुषंगाने पाठपुरावा करणे याबाबतही यावेळी चर्चा झाली. त्याचबरोबर

▶▶ उर्वरित पान २ वर

## अर्चनाताई व राज पाटील दांपत्यांना सरपंच सेवा संघ महाराष्ट्र राज्याचा पुरस्कार !

### उद्या भास्कर पेरे पाटील यांच्या हस्ते होणार पुरस्काराचे वितरण

**वडवणी । प्रतिनिधी**

सरपंच सेवा संघ महाराष्ट्र राज्य या अहिल्यानगर येथील राज्य स्तरावर काम करणाऱ्या नामांकित संस्थेच्या वतीने बीड जिल्ह्यातील तिगाव तालुका वडवणी येथील सरपंच सौ अर्चना राज पाटील यांना आदर्श सरपंच पुरस्कार जाहीर झाला आहे. तर लहा दुष्काळाशी फाउंडेशनचे अध्यक्ष तथा बीड जिल्ह्यातील नामांकित सामाजिक कार्यकर्ते एडवोकेट राज पाटील यांना वृक्ष संवर्धक मित्र हा पुरस्कार या संस्थेच्या वतीने जाहीर करण्यात आला आहे या पुरस्काराचे वितरण आदर्श सरपंच भास्करराव पेरे पाटील यांच्यासह राज्यातील नामांकित राजकीय नेते मंडळीच्या उपस्थितीत उद्या १५ जून रोजी आहे अहिल्यानगर येथे होणार ▶▶ उर्वरित पान २ वर





*माजी मंत्री धनंजय मुंडे साहेब बीडमध्ये आले असता राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे बप्पासाहेब घुगे यांनी स्वागत केले*

## कृषी दुकानदारांनी शेतकऱ्यांना शासनाने ठरवून दिलेल्या नियमाने खत, बी- बियाणे वितरित करावे: खिजर सौदागर

### स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन सादर

**तलवाडा। प्रतिनिधी**

खरीप हंगामास सुरुवात झाली असून शेतकरी पेरणीच्या तयारीत आहे,मशागती चे कामे पूर्ण झाली असून पाऊस पडल्याने कापूस लागवडीस सुरुवात झाली असून कृषी दुकानावर शेतकऱ्यांची गर्दी होतांना दिसत आहे.या दरम्यान शेतकऱ्यांना कृषी दुकानदारांनी शासनाने घालून दिलेल्या नियम अटी नुसार खत, बी – बियाणे वाटप करावे यासह विविध मागण्याचे निवेदन स्वाभिमानी शेतकरी संघटनेने जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली




असून कृषी दुकानदारांनी नियमांचे पालन न केल्यास कार्यवाही करण्याची मागणी केली आहे.

▶▶ उर्वरित पान २ वर

## पोलीस निरीक्षक अशोक मुदिराज यांची गुटखा माफियावर कारवाई ! एक लाख ३९ हजार रुपयाचा मुद्देमाल जप्त

**बीड । प्रतिनिधी**

पेठ बीड पोलीसांची अवैद्य धंद्यावर कार्यवाही –गुटखा ठेवणारा व त्याची चोरटी विक्री करणारा यांचेवर छापा मारला असता १,३९,०१७/– रू.चा मुद्येमाल जप्त

पेठ बीड पोलीस ठाणेचे पोलीस निरीक्षक अशोक मुदिराज गोपनिय माहिती मिळाली की, भुईगल्ली या ठिकाणी मयत नामे वाजेद हसन बागवान रा. भूईगल्ली यांचे घरात, घर भाडयाने करून घरात गोवा, आर.एम.डी., राजनिवास तंबाखू, बाबा, हिरा, विमल असा वेगवेगळ्या प्रकारचा गुटखा ठेवणारा व त्याची चोरटी विक्री करत आहे. अशी खात्री लायक माहिती मिळाल्यावरून आम्ही सोबत पोलीस निरीक्षक अशोक मुदिराज व सोबत पोह १६१३ रमेश, पोअं/१९६१ अल्ताफ, चालक पोअ/२१८० अनिल यांनी भोई गल्ली येथे मयत वाजेद हसन बागवान रा. भूईगल्ली येथे शेख खदीर शेख बशीर, शेख अरसलान शेख खदीर असे गुटखा ठेवून त्याची विक्री करत आहेत व ठेवत आसल्याने सदर ठिकाणी छापा मारला असता वर नमूद वर्णनाचा गुटखा जागीच टाकून वर नमूद आरोपी पोलीस पार्टीस पाहून पळून गेल्याने त्यांचेवर पोलीस स्टेशन पेठ बीड येथे गु.र.नं. १६९/२०२५ कलम १२३,२७४,२७५ भा.न्या.सं. २०२३ प्रमाणे वर नमूद आरोपी यांचे



ताब्यातील असलेल्या घरामध्ये वरील वर्णणाचा गुटखा किंमत– १,०९,०१७/–रूपायाचा गुटखा व मोटारसायकल चक–२३ छ ६३३६ असा एकूण १,३९,०१७/– रूपायाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक सो नवनीत काँवत अप्पर पोलीस अधीक्षक सो सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधीकारी यांचे नेतृत्वाखाली मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अशोक मुदिराज, पोह १६१३ रमेश, पोअं/१९६१ अल्ताफ, चालक पोअ/२१८० अनिल सर्व नेमणूक पोलीस स्टेशन पेठ बीड यांनी पार पाडली.

## हरवलेल्या व्यक्तीबाबत निवेदन

**बीड । प्रतिनिधी**

शिवाजीनगर पोलीस ठाणे बीड येथे गुरन६६/२०२५ कलम १३७ (२) भा.न्या.स. प्रमाणे दाखल झालेल्या गुन्हयातील पिडीत अल्पवयीन मुलगी सोनाली रावसाहेब साळुंके वय १७ वर्षे ५ महिने रा. हनुमान मंदीर जवळ चौसाळा ता.जि.बीड हल्ली मुक्काम कुलस्वामीनी होस्टेल, बीएसएनएल ऑफीस समोर डिपी रोड, बीड दि. ३१/०१/२०२५ रोजी दुपारी ०४.०० वा सुमारास तिचे हॉस्टेलच्या मॅडम यांना परीक्ष आहे असे सांगून कोणाला काहीही न सांगता माझी परिक्षा आहे मला गावाकडे जायचे आहे असे म्हणून निघुण गेली आहे. सदर मलीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

नाव सोनाली रावसाहेब साळुंके, वय १७ वर्षे ०५ महिने, पत्ता रा. हनुमान मंदिर जवळ चौसाळा,ता. जि. बीड, रंग गोरा,उंची ०५ फुट, अंगात काळया ▶▶ उर्वरित पान २ वर

